महाराष्ट्र शासन

उच्च शिक्षण संचालनालय

# शिक्षण शुल्क समिती, मुंबई

(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)

कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१
Web:www.sssmumbai.org Tel-022 22694478 E-mail : sssbedmed@gmail.com/jd.hesss-mh@gov.in

**विषय:- दि.०३.०४.२०१८ रोजी सकाळी ११:०० वाजता मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती तथा अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई, शासकीय अध्यापक महाविद्यालय, एल्फिस्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई - येथे शासकीय अध्यापक महाविद्यालयातील प्राचार्यांच्या दालनामध्ये पार पडलेल्या शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीचे इतिवृत्त ..**

**सदर बैठकीस खालील अधिकारी/पदाधिकारी उपस्थित होते.**

| अ.क्र. | **उपस्थित अधिकारी/ पदाधिकारी** | **पदनाम** |
|---|---|---|
| १ | डॉ. एम. बी. भिडे, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई | सदस्य |
| २ | श्री. संतोष परब, सनदी लेखापाल | सदस्य |
| ३ | श्रीमती नलिनी पाटील, खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी, (शिक्षणशास्त्र) | सदस्य |
| ४ | डॉ. रविंद्र कडू, खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शारिरीक शिक्षणशास्त्र) | सदस्य |
| ५ | डॉ. सुशीलकुमार चौधरी, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | सदस्य |
| ६ | मा. डॉ. धनराज माने- संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |
| ७ | मा. रोहिणी भालेकर, उप सचिव, उच्च शिक्षण, मंत्रालय, मुंबई | विशेष निमंत्रित |
| ८ | डॉ. तुकाराम गाढवे, तज्ज्ञ (निमंत्रित) | सदस्य |

मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय यांचे प्रतिनिधी बैठकीस अनुपस्थित होते.

**या बैठकीत घेण्यात आलेले महत्त्वाचे मुद्देनिहाय निर्णय खालीलप्रमाणे......**

**१. मुद्दा क्र. १ राज्यातील शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या शै. वर्ष २०१६-१७ च्या तज्ज्ञांकडून तपासणी झालेल्या शुल्कास मान्यता मिळणेबाबत.**

शिक्षण शुल्क समितीने नियुक्त केलेल्या तज्ज्ञांनी छाननीअंती निश्चित केलेले बी. एड., एम. एड., बी. पी. एड. व एम. पी. एड. या अभ्यासक्रमाचे (महाविद्यालयांचे) एकूण ११९ प्रस्ताव समितीसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. तज्ज्ञांनी तपासलेले प्रस्ताव स्प्रेड शिट स्वरूपात समिती सदस्यांसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. समितीने सदर प्रस्तावापैकी ऋण ५० टक्के ते धन १० टक्के पर्यंत मर्यादेत शिक्षण शुल्कात वाढ देण्याची शिफारस केलेले प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहेत. शुल्क निश्चितीच्या बाबतीत समितीने एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

१. **परिशिष्ट अ** मध्ये बैठकीत ठेवलेल्या ५७ प्रस्तावांपैकी नमुद ४९ बी. एड. अभ्यासक्रमांच्या/महाविद्यालयांच्या उपसमितीने निश्चित/ अंतीम केलेल्या शुल्काला शिक्षण शुल्क समितीची मंजूरी देण्यात आलेली आहे.

२. **परिशिष्ट ब** उर्वरित बी. एड. अभ्यासक्रमांच्या / महाविद्यालयांच्या ०८ प्रस्तावापैकी ०६ प्रस्तावातील (अ.क्र. १३, १४, २५, ३१, ४६ व ५७) शुल्कामध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त ऋणात्मक वाढ असल्यामुळे संबंधीत महाविद्यालयांना नोटीस देऊन कळवावे. योग्य ती माहिती मागवून प्रस्तावांची पुनर्छाननी करून ती पुढील बैठकीत ठेवण्यात यावी. पैकी ५० टक्क्यांपेक्षा जास्त ऋणात्मक वाढ असलेल्या ६ महाविद्यालयांपैकी अ.क्र. १४ या महाविद्यालयाची मान्यता एन.सी.टी.ई. ने रद्द केलेली असल्यामुळे या महाविद्यालयाचे शिक्षण शुल्क निश्चित करून देण्यात येवू नये, असा निर्णय समितीने घेतलेला आहे. तसेच के. जे. सोमैय्या शिक्षणशास्त्र महाविद्यालय, विद्याविहार (अ.क्र.१५) हे अल्पसंख्यांक महाविद्यालय असल्यामुळे न्यायालयीन आदेश व विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल असे ठरले. उर्वरित मराठवाडा असोसिएशन फॉर सोशल सर्व्हिसेस, ए. डी. कॉलेज ऑफ एज्युकेशन, सुलीभंजन, खुल्ताबाद, जि. औरंगाबाद (अ.क्र.४१) या महाविद्यालयाची विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद यांच्यामार्फत संपूर्ण तपासणी करून महाविद्यालयातील आर्थिक बाबी व भौतिक सोईसुविधांचा सविस्तर आढावा घ्यावा व विभागीय सहसंचालक यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील बैठकीत शुल्क मान्य करून देण्यात येईल.

३. **परिशिष्ट क** बैठकीत ठेवलेल्या बी. एड अभ्यासक्रमाच्या १९ (अल्पसंख्यांक) महाविद्यालयाच्या शुल्कास न्यायालयीन आदेशास अनुसरून शुल्क निश्चितीस स्थगीती देण्यात आली. न्यायालयीन आदेश व

एन.सी.टी.ई. चे अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या शुल्काबाबत प्राप्त झालेल्या दि.०९.११.२०१६ चे स्पष्टीकरण याबाबत विधी व न्याय विभागाकडून कायदेशीर मत प्राप्त झाल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल.

४. **परिशिष्ट ड** बैठकीत ठेवलेल्या एम. एड महाविद्यालयांच्या १८ प्रस्तावांपैकी १३ महाविद्यालयांच्या शुल्कास अंतिम मान्यता देण्यात आली आहे. पैकी ०१ महाविद्यालयामार्फत (अ.क्र.१८) समितीस सादर केलेल्या प्रस्तावांमध्ये कमी शुल्क प्रस्तावीत केले असल्यामुळे प्रस्तावीत शुल्कास अंतिम मंजूरी देण्यात आली.

५. **परिशिष्ट इ** बैठकीत ठेवलेल्या एम. एड महाविद्यालयांच्या उर्वरित ०५ महाविद्यालयाच्या प्रस्तावांपैकी ०४ महाविद्यालयांच्या प्रस्तावांत (अ.क्र. ११, १२, १३ व १४) ५० टक्क्यांपेक्षा जास्त ऋणात्मक वाढ असल्यामुळे संबंधीत महाविद्यालयांना नोटीस देऊन कळवावे. योग्य ती माहिती मागवून प्रस्तावांची पुनर्छाननी करून ती पुढील बैठकीत ठेवण्यात यावी, असे ठरले व एका महाविद्यालयाची (अ.क्र.०४) मान्यता एन.सी.टी.ई. ने रद्द केलेली असल्यामुळे या महाविद्यालयाचे शिक्षण शुल्क निश्चित करून देण्यात येवू नये, असा निर्णय समितीने घेतलेला आहे.

६. **परिशिष्ट फ** बैठकीत ठेवलेल्या एम. एड अभ्यासक्रमाच्या (अल्पसंख्यांक) ०४ महाविद्यालयांच्या शुल्कास न्यायालयीन आदेशास अनुसरून शुल्क निश्चितीस स्थगीती देण्यात आली. न्यायालयीन आदेश व एन.सी.टी.ई. चे अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या शुल्काबाबत प्राप्त झालेल्या दि.०९.११.२०१६ चे स्पष्टीकरण याबाबत विधी व न्याय विभागाकडून कायदेशीर मत प्राप्त झाल्यानंतर पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल.

७. **परिशिष्ट ग** बैठकीत ठेवलेल्या बी. पी. एड अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाच्या एकूण १५ पैकी १३ महाविद्यालयांच्या शुल्कास अंतिम मान्यता देण्यात आली.

८. **परिशिष्ट ह** बैठकीत ठेवलेल्या बी. पी. एड अभ्यासक्रमाच्या उर्वरित ०२ महाविद्यालयांपैकी ०१ महाविद्यालयाच्या (अ.क्र.०७) प्रस्तावात ५० टक्क्यांपेक्षा जास्त ऋणात्मक वाढ असल्यामुळे संबंधीत महाविद्यालयांना नोटीस देऊन कळवावे. योग्य ती माहिती मागवून प्रस्तावांची पुनर्छाननी करून ती पुढील बैठकीत ठेवण्यात यावी व एका महाविद्यालयाची (अ.क्र.१५) मान्यता एन.सी.टी.ई. ने रद्द केलेली असल्यामुळे या महाविद्यालयाचे शिक्षण शुल्क निश्चित करून देण्यात येवू नये, असा निर्णय समितीने घेतलेला आहे.

९. **परिशिष्ट ई** बैठकीत ठेवण्यात आलेल्या एम. पी. एड अभ्यासक्रमाच्या एकूण ०५ महाविद्यालयांच्या शुल्कास अंतिम मान्यता देण्यात आली.

१०. **परिशिष्ट ज** एम. पी. एड अभ्यासक्रम (अल्पसंख्यांक) ०१ महाविद्यालयांच्या शुल्कास न्यायालयीन आदेशास अनुसरून शुल्क निश्चितीस स्थगीती देण्यात आली. न्यायालयीन आदेश व एन.सी.टी.ई. चे अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या शुल्काबाबत प्राप्त झालेल्या दि.०९.११.२०१६ चे स्पष्टीकरण याबाबत विधी व न्याय विभागाकडून कायदेशीर मत प्राप्त झाल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल.

शुल्क निश्चिती झालेल्या, पुनर्छाननीसाठी सूचविलेल्या तसेच एन.सी.टी.ई. ने मान्यता रद्द केलेल्या उपरोक्त महाविद्यालयांची यादी परिशिष्ट निहाय सोबत जोडलेली आहे.

२. **दि.२६.०४.२०१७ व दि.०५.०७.२०१७ च्या बैठकीच्या अनुषंगाने ऋण शुल्क होणाऱ्या महाविद्यालयांना प्रत्यक्ष उपसमितीसमोर बोलावून विचारणा करावी, अशा महाविद्यालयांनी लेखी स्वरूपात केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शुल्क निश्चितीचा निर्णय घेणेबाबत.**

सनदी लेखापाल/खर्च लेखापाल यांच्या गणनेव्दारे जे शुल्क येत आहे, तेच शुल्क मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला. तसेच ज्या महाविद्यालयांच्या शुल्कात ५० टक्क्यांपेक्षा जास्त ऋणात्मक वाढ झालेली आहे, त्या महाविद्यालयांकडून आवश्यक ती माहिती मागवून तज्ज्ञांकडून प्रस्तावांची पूनर्तपासणी करावी, असा निर्णय घेण्यात आला.

३. **राज्यातील शासकीय अध्यापक महाविद्यालयात चालविण्यात येणारा एम. एड. अभ्यासक्रम चालू ठेवणेबाबत निर्णय होणे:-**

समितीच्या कार्यकक्षेतील मुद्दा नसल्यामुळे याचा निर्णय विभागीय पातळीवर घेण्यात यावा.

४. **विनाअनुदानित तत्वावरील अभ्यासक्रमासाठीचे विद्यापीठाचे विभाग व स्वायत्त महाविद्यालये यांच्या शुल्क निश्चितीबाबत विधी व न्याय विभागाकडे मत मागविण्यात आलेले आहे. ते अद्याप प्राप्त झालेले नाही.**

याबाबत पाठपुरावा करावा.

५. **राज्यातील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सन २०१७-१८ पासून सुरू होत असलेल्या इंटीग्रेटेड बी.एड व एम. एड तीन वर्ष अभ्यासक्रमाच्या शुल्काबाबत.**

याबाबत शुल्क निश्चितीसाठी विहीत नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात यावा, असा निर्णय झाला.

६. **दि.१९.०१.२०१६ च्या शासन निर्णयान्वये दरवर्षी शुल्क निश्चितीसाठी प्रस्ताव बोलाविण्यात यावेत, असा उल्लेख आहे, परंतू दि.१९.०१.२०१६ चा शासन निर्णय व एन. सी. टी. ई. नोटीफिकेशन दि.१८-०६-२००२ नुसार शिक्षण शुल्क समितीने एकदा निश्चित करून दिलेले शुल्क तीन वर्षासाठी लागू राहील, असा उल्लेख आहे, तरी प्रस्ताव मागविणेबाबत मार्गदर्शन व्हावे.**

ज्या महाविद्यालयांचे सन २०१६-१७ चे शुल्क निश्चित झाले, ते शुल्क तीन वर्षासाठी लागू राहील व ज्या महाविद्यालयांनी सन २०१६-१७ ला प्रस्ताव पाठविले नाहीत, अशा महाविद्यालयांकडून सन २०१७-१८ करीता प्रस्ताव मागविण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आला.

७. **याचिका क्रमांक. ६९७६/२०१७ मायनॉरिटी बी. एड कॉलेज मॅनेजमेंट असोसिएशन, औरंगाबाद विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर ही याचिका न्यायालयाने निकाली काढलेली आहे, तरी अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्याबाबत निर्णय होणेबाबत.**

याचिका क्रमांक ६९७६/२०१७ मायनॉरिटी बी. एड कॉलेज मॅनेजमेंट असोसिएशन, औरंगाबाद विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर ही याचिका न्यायालयाने निकाली काढलेली असून हा निकाल तसेच एन.सी.टी.ई. ने शिक्षण शुल्क समितीस दिलेल्या दि.०९.११.२०१६ चे स्पष्टीकरण याबाबत विधी व न्याय विभागाकडून कायदेशीर मत प्राप्त करून घ्यावेत.

८. **राज्यातील विशेष बी.एड. महाविद्यालयांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते, परंतू केवळ एका महाविद्यालयाने प्रस्ताव सादर केलेला आहे. प्रस्ताव सादर न करणाऱ्या उर्वरित महाविद्यालयांच्या बाबतीत निर्णय होणेबाबत.**

याबाबत अजून एक संधी देण्यात यावी तसेच शिक्षण संचालक यांच्या अध्यक्षतेखाली संचालनालय स्तरावर बैठक आयोजित करण्यात यावी.

९. **समितीतील अशासकीय सदस्यांच्या प्रवास भत्त्यासंदर्भात निर्णय होणेबाबत.**

शुल्क नियामक प्राधिकरण, बांद्रा येथे ज्याप्रमाणे देण्यात येतो त्यानुसार या कार्यालयातील अशासकीय सदस्यांना देण्यात यावा, करिता शासनास विहीत मार्गाने प्रस्ताव सादर करावा.

१०. **शिक्षण शुल्क निश्चितीस उशीर झाल्यामुळे समाजकल्याण, आदिवासी विभाग इ. शिष्यवृत्ती अदा करणाऱ्या विभागांना पत्र देण्यास परवानगी मिळणेबाबत.**

ज्या महाविद्यालयांचे सन २०१६-१७ चे शिक्षण शुल्क निश्चित झाले अशा महाविद्यालयांची यादी समाजकल्याण, आदिवासी विभाग इ. शिष्यवृत्ती अदा करणाऱ्या विभागांना पाठविण्यात यावी.

११. **जय जगदंबा एम. एड कॉलेज वैराग ता. बार्शी, जि. सोलापूर या महाविद्यालयाच्या प्रस्तावात एन.सी.टी.ई. ची सुधारित ऑर्डर जोडलेली नाही, तरी या महाविद्यालयाच्या शुल्क निश्चितीबाबत निर्णय होणेबाबत:-**

सदर महाविद्यालयाच्या प्रस्तावात एन. सी. टी. ई. ची सुधारित ऑर्डर मिळेपर्यंत शुल्कास मान्यता देण्यात येवू नये, असे ठरले.

१२. **जामिया शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अक्कलकुवा, जि. नंदूरबार यांनी शुल्क वाढी संदर्भात केलेल्या विनंतीबाबत**

अल्पसंख्यांक महाविद्यालय असल्यामुळे स्थगिती देण्यात येत आहे. न्यायालयीन आदेश तसेच विधी व न्याय विभागाकडून कायदेशीर मत प्राप्त झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

१३. **के. जे. सोमैय्या शिक्षणशास्त्र महाविद्यालय, विद्याविहार, मुंबई यांच्या शुल्क निश्चितीच्या बी.एड व एम. एड अभ्यासक्रमाच्या दोन्ही प्रस्तावात असलेल्या एकच शिक्षक स्टाफ बद्दल चर्चा.**

अल्पसंख्यांक महाविद्यालय असल्यामुळे स्थगिती देण्यात येत आहे. न्यायालयीन आदेश तसेच विधी व न्याय विभागाकडून कायदेशीर मत प्राप्त झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

१४. **राजीव गांधी शिक्षण महाविद्यालय, आष्टी यांच्या प्रस्ताव सादर न करता अंतिम मान्यताप्राप्त शुल्क मंजूरीच्या विनंतीबाबत.**

सदर महाविद्यालयाकडून शुल्क निश्चितीबाबत प्रस्ताव मागविण्यात यावा, असा निर्णय झाला.

१५. **रिझवी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बांद्रा, मातोश्री सायरबाई चंपालालजी चोपडा शिक्षणशास्त्र महा. खामगाव, इकरा शिक्षणशास्त्र महा. जळगाव व अभिनव शिक्षणशास्त्र महा, पुणे या महाविद्यालयांच्या तक्रारीबाबत यांच्यासोबत चर्चा.**

पैकी अभिनव शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे या महाविद्यालयाकडून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून सनदी लेखापाल/ खर्च लेखापाल यांच्याकडून पूनर्तपासणी करावी, पुढील बैठकीत शुल्क निश्चिती करण्यात येईल, तसेच इतर महाविद्यालये अल्पसंख्यांक महाविद्यालये असल्यामुळे स्थगिती देण्यात येत आहे. न्यायालयीन आदेश तसेच विधी व न्याय विभागाकडून कायदेशीर मत प्राप्त झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

**१६. स्व. गोविंदराव पाटील शिक्षण महाविद्यालय, दारव्हा यांच्या सन २०१६-१७ साठी निश्चित करून दिलेले शुल्क वाढ करून मिळणेबाबतच्या विनंतीबाबत.**

या महाविद्यालयाकडून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून सनदी लेखापाल/ खर्च लेखापाल यांच्याकडून पूनर्तपासणी करावी, पुढील बैठकीत शुल्क निश्चिती करण्यात येईल.

१७. **रॉयल कॉलेज ऑफ एज्युकेशन ॲन्ड रिसर्च फॉर वूमेन, मिरा रोड, ठाणे या अल्पसंख्यांक महाविद्यालयाने शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांनी सन २०१६-१७ साठी निश्चित करून दिलेल्या शुल्कापेक्षा जास्त शुल्क आकारणी केलेली आहे, तरी याबाबत निर्णय हाणेबाबत.**

हे अल्पसंख्यांक महाविद्यालय असल्यामुळे स्थगिती देण्यात येत आहे. न्यायालयीन आदेश तसेच विधी व न्याय विभागाकडून कायदेशीर मत प्राप्त झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

१८. **विद्याधीराज कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, न्यू पनवेल यांच्या शुल्क वाढीच्या विनंतीबाबत.**

अल्पसंख्यांक महाविद्यालय असल्यामुळे स्थगिती देण्यात येत आहे. न्यायालयीन आदेश तसेच विधी व न्याय विभागाकडून कायदेशीर मत प्राप्त झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

**१९. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.**

आभार प्रदर्शनानंतर मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या परवानगीने बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव,
शिक्षण शुल्क समिती तथा
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे

अध्यक्ष,
शिक्षण शुल्क समिती तथा
अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई